# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** नंदुरबार शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0049 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**24/01/2026 01:04

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 23/01/2026

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/01/2026

**Time From (वेळेपासून):** 14:23 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:43 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/01/2026 **Time (वेळ):** 01:04 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/01/2026 01:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय व, नंदुरबार,नंदुरबार, 425412

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): पोलीस निरीक्षक विकास शिवाजी लोंढे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ,नंदुरबार,नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र, 425412,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ,नंदुरबार,नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र, 425412,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7588029368

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | किरण गणेश पाडवी | | | 1. 20,अरविंद नगर जिजामाता कालेजसमोर ,तळोदा रोड नंदुरबार ,नंदुरबार,नंदुरबार शहर, नंदुरबार,महाराष्ट्र,भारत-425412 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 65,000/ (500 रुपये दराच्या 50 भारतीय चलनी नोटा व लहान मुलांच्या खेळण्याच्या व हुबेहुब खऱ्या चलनासार | 65,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

65,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी, विकास शिवाजी लोंढे, वय 35 वर्षे, पोलीस निरीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार. मो.नं. 7588029368
सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार येथे मागील 05 महीन्यापासुन पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिनांक 22/01/2026 रोजी तक्रारदार श्री. विक्रम गावीत, रा. उंबर्डी ता. नवापुर जिल्हा नंदुरबार यांनी पो. हवा. देवराम गावीत नेमणुक ला.प्र.वि. नंदुरबार यांना संपर्क करुन एक लोकसेवका विरुध्द तक्रार असल्या बाबत माहिती कळवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नंदुरबार येथे हजर होवुन लोकसेवक विरुध्द लाचमागणी बाबत तक्रार कळुवन कारवाई करण्याबाबतविनंती केली. त्याप्रमाणे आम्ही अति कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. मर्या, नंदुरबार यांना पत्र पाठवुन त्यांच्याकडुन पंच उपलब्ध करुन घेतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार विक्रम छगन गावीत यांना पंच, सापळा पथकातील अंमलदार पो.हवा./32 देवराम गावीत , पोहवा/ 967 विजय ठाकरे, यांचे समक्ष त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव श्री. विक्रम छगन गावीत वय 43 वर्शे, व्यवसाय षेती व , रा. उंबर्डी ता. नवापुर जिल्हा नंदुरबार असे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख सांगुन, त्यांची पंच व सापळा पथकातील अंमलदार यांची ओळख करुन देवुन पुढील सापळा कारवाई सुरु केली.

आम्ही तक्रारदार विक्रम छगन गावीत यांना त्यांचे तक्रारीबाबत सापळा पथकासमक्ष विचारपुस करता त्यांनी सांगितले की, " आमचे उबर्डी गावाचे शिवारात माझ्या शेताचे जवळ रंगावली धरण आहे. त्याचा सुमारे 200 हेक्टर जलक्षेत्राचा तलाव आहे. मागिल वर्शी मार्च 2025 मध्ये नंददर्शन या वृत्तपत्रात महाराष्ट्र शासनाचे मत्स्यव्यवसाय विभागाकडुन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नंदुरबार यांच्या वतीने आमचे गावाचे रंगावली तलावामध्ये मासेमारीहक्क करण्यासाठी तलाव ठेका बाबतची निविदा पाहीली. सदर निविदेची अंतिम मुदत 28/04/2025 रोजी पावेतो होती. म्हणुन मी नंदुरबार येथील मत्स्यव्यवसाय विभागाचे कार्यालयात जावुन तेथील वरीष्ठ अधिकारी श्री. किरण पाडवी यांची भेट घेवुन माहिती घेतली असता त्यांनी सदर तलाव ठेका घेण्याची पध्दत समजावुन सांगितली तसेच सदर तलाव ठेका हा सहकारी संस्थेला देण्यात येत असल्याचे सांगितले म्हणुन मी खैरवे ता. नवापुर जिल्हा नंदुरबार येथील नवजीवन मच्छिमार सहकारी संस्थेशी संपर्क केला व त्यानंतर नवजीवन मच्छिमार सहकारी संस्थेमार्फत माझ्या नावाचे करार करण्यात आला होता. त्यानंतर मी नवजीवन मच्छिमार सहकारी संस्थेमार्फत रंगावली तलावाचा मासेमारीचे हक्कसाठी तलाव ठेका मिळण्याकामी मा. सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, नंदुरबार यांना निविदा सादर केली होती. त्यानंतर दिनाक 30/07/2025 रोजीच्या जिल्हास्तरीय तलाव ठेका समिती सभेत दि.01/07/2025 ते दि.30/06/2030 पावेतो पाच वर्षाचे कालावधी करीता रंगावली तलावाचे सामंजस्य करार माझ्या नावे असलेल्या करारास मान्यता मिळाली होती. तसे दिनांक 28/05/2025 रोजी करारपत्र-करण्यात आले होते.त्यानंतर मी वेळोवेळी 65,200/-रुपये डिमांड ड्राफ्ट सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग,धुळे यांच्या नावे भरणा केली होती. त्यानंतर दि.01/08/2025 रोजी मत्स्यव्यवसाय,

विभाग, नंदुरबार कार्यालयातील अधिकारी श्री. किरण पाडवी यांनी मला रंगावली तलाव ठेका मंजुरी बाबतचे पत्राची झेरॉक्स प्रत देवुन "तुला रंगावली तलावाचा ठेका मी मिळवुन दिला आहे त्याच्या मोबदल्यात एक लाख रुपये दयावे लागतील" असे म्हणुन माझ्याकडुन एक लाख रुपये लाचेची मागणी केली. परंतु त्यावेळी पैसे नसल्याने त्यांना मी सदर लाच रक्कम दिली नव्हती. त्यानंतर दिनांक 09/01/2026 रोजी मी माझ्या "युव्हिज फुडस" हॉटेल चिंचपाडा येथे हजर असतांना मत्स्यव्यवसाय विभाग, नंदुरबार येथील किरण पाडवी यांचे कर्मचारी प्रकाश गावीत हे आले. त्यांनी एका कागदावर लिहीलेल्या अर्जाच्या खालच्या बाजुला माझे नावाचे वरील बाजुस मला माझी सही करण्यास सांगितले. तेव्हा मी सदर अर्ज वाचुन पाहता त्यात माझ्या वैयक्तीक कारणास्तव रंगावली तलावाचे मासेमारी हक्क करार रद्द करीत असले बाबतचा मजकुर लिहीलेला होता, तेव्हा मी प्रकाश गावीत यांना मला मासेमारीचा करार रद्द करायचा नाही तुम्ही कसे काय माझी खोटया मजकुरच्या अर्जावर सही घेतली ? असे विचारले असता त्यांनी मला किरण पाडवी साहेबांना भेटुन घ्या मला काही सांगु नका असे सांगुन निघुन गेले होते. त्यानंतर दिनांक 19/01/2026 रोजी सोमवारी मी मत्स्यव्यवसाय विभाग, नंदुरबार येथील कार्यालयात गेलो तेथील अधिकारी श्री. किरण पाडवी यांना भेटलो असता त्यांनी मला "तु रंगावली तलावा मध्ये मासे टाकलेच नाहीत, तुला दिलेला तलाव ठेका रद्द करण्याबाबत दोन दिवस विचार करुन सांगतो" असे सांगितले. दोन दिवसानंतर दि.22/01/2026 रोजी पुन्हा श्री. किरण पाडवी साहेबांना भेटलो तेव्हा त्यांनी मला "तुला जर तलावठेका वाचवायचा असेल तर मला 2 लाख 65 हजार रुपये दयावे लागतील. तु जर पैसे दिले नाहीत, तर तुझा तलाव ठेका रद्द करण्याबाबतचा अर्ज माझ्याकडे आहे त्या आधारे मी तुझा तलाव ठेका रद्द करुन टाकेल" असे म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी केली. किरण पाडवी यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 9209975081 यावरुन माझा मोबाईल क्रमांक 9021690754 वर व्हॉटस अॅपद्वारे त्यांचे परीचयाचे श्री.योहान अरविंद गावीत यांचे एचडीएफसी बँक, शाखा नवापुर येथील चालु खाते क्रमांक 50200049112839 असा मजुकरचा फोटो पाठवुन मला सदर बँक खात्यावर 2 लाख रुपये टाकण्यास व उर्वरीत 65,000/- रुपये रोख कार्यालयात आणुन देण्याचे सांगितले होते. परंतु माझी मत्स्यव्यवसाय विभाग, नंदुरबार येथील अधिकारी श्री. किरण पाडवी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथील माझे ओळखीचे श्री. देवराम गावीत यांना संपर्क केला व दि.22/01/2026 रोजी ला.प्र.वि. नंदुरबार येथे तक्रार अर्ज सादर केला आहे"

उपरोक्त प्रमाणे तक्रारीचे अनुषंगाने लाचमागणी पडताळणी कारवाई करावयाची असल्याने आम्ही तक्रारदार विक्रम गावीत व पंच क्र. 1, श्री. प्रशांत बोरदे यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोहवा/विजय ठाकरे यांनी नविन मेमरीकार्ड काढुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन ते सुरु करुन तक्रारदार विक्रम गावीत यांचे शर्टचे आत बनियनला बांधुन तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलने 14.06 वा. मत्स्यव्यवसाय विभाग, नंदुरबार येथे लोकसेवक किरण पाडवी यांची भेट घेणे कामी रवाना केले होते.

तक्रारदार विक्रम गावीत व पंच क्र. 1 श्री प्रशांत बोरदे हे सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर पोहवा/विजय ठाकरे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. आम्ही पंच क्र. 1 व तक्रारदार यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी ती कथन केली. त्यानंतर आम्ही सापळा पथकासमक्ष तक्रारदार व मत्स्यव्यवसाय विभाग, नंदुरबार येथील अधिकारी श्री. किरण पाडवी यांचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषणामध्ये लोकसेवक श्री. किरण पाडवी यांनी तक्रारदार यांना ट्रान्सफर केले का ? असे विचारले तेव्हा तक्रारदार विक्रम गावीत यांनी त्यांना तात्रिंक अडचण आहे. असे सांगितले असता त्यांनी 2 ला की 65ला ? असे तक्रादार यांना विचारुन तक्रारदार यांचेकडुन पुर्वी केलेल्या 2 लाख 65 हजार रूपयाचे लाच मागणीस दुजोरा दिला, परंतु तक्रारदार व लोकसेवक किरण पाडवी यांच्या नमुद संभाषणात लाचेची मागणी स्पष्ट स्वरुपात नसल्याचे तसेच कामाबाबत काहिच बोलणे झालेले दिसुन येत नसल्याने तक्रारदार विक्रम गावीत यांना दि.23/01/2026 रोजी पुन्हा लोकसेवक किरण पाडवी यांची भेट घेणे कामी पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार दि. 23/01/2026 रोजी तक्रारदार विक्रम गावीत यांना लोकसेवक किरण पाडवी यांची भेट घेणे कामी पंच क्र. 1 श्री. प्रशांत बोरदे यांचे सोबत पाठविले असता लोकसेवक किरण पाडवी यांची भेट झाल्यानंतर तक्रारदार यांनी 65 पैकी 40 झाले आहेत उर्वरीत 25 ची अर्ध्या तासात व्यवस्था करतो, असे बोलल्यावर लोकसेवक किरण पाटील यांनी हं. म्हणुन होकार दिला. तसेच तक्रारदार यांनी 2 लाख रुपये चेकने बँक खात्यावर टाकतो, असे बोलल्यावर लोकसेवक किरण पाडवी यांनी चालेल चालेल असे बोलुन तक्रारदार यांच्या मासेमारीच्या तलाव ठेक्यास अडचण येणार नाही व तक्रारदार याचा सहि घेतलेला अर्ज फाडुन टाकेल. असे बोलले तेव्हा तक्रारदार यांन त्यांना अर्ध्या तासात येतो. असे सांगितले असता लोकसेवक किरण पाडवी यांनी होकार देऊन लाचेची रक्कम स्विकारण्यास संमती दर्शवुन लाचमागणी केल्याबाबत खात्री झाली. यावरून लोकसेवक किरण पाडवी यांनी तक्रारदार विक्रम छगन गावीत यांचेकडे तक्रारदार यांना नवजीवन मच्छिमार सहकारी संस्थेमार्फत दि. 01/07/2025 ते दि. 30/06/2030

पावेतो पाच वर्षाचे कालावधी करीता तक्रारदार यांच्या नावे असलेल्या करारास रंगावली तलावाचा मासेमारीचे हक्कसाठी तलाव ठेका मिळवुन दिल्याचे मोबदल्यात प्रथम 1,00,000/- रूपये लाचेची मागणी केली परंतु तक्रारदार यांनी सदर लाचेची रक्कम न दिल्याने दि.22/01/2026 लोकसेवक किरण पाडवी यांनी तक्रारदार यांना तलावात मासे न टाकल्याचे कारण सांगुन तक्रारदार यांचा ठेका रद्द करुन अन्य इसमास देण्याची भिती दाखवुन ठेका रद्द न करण्यासाठी तक्रारदार यांच्या कडे 2 लाख 65 हजार रुपये लाचेची मागणी केल्याबाबत आमची व सापळा पथकाची खात्री झाली होती. तसा लाच मागणीबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदार विक्रम गावीत यांना लोकसेवक किरण पाडवी यांचे मागणीप्रमाणे 65,000/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी हजर करण्यास सांगीतले. परंतु तक्रारदार यांनी त्यांचे शेती व मजुरीचे बचत केलेले 25,000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 50 चलनी नोटा हजर केल्या. यानंतर आम्ही लहान मुलांच्या खेळण्याच्या व हुबेहुब खऱ्या चलनासारख्या दिसणाऱ्या 500/-रु दराच्या एकुण 80 डमी नोटा खऱ्या चलनी नोटांमध्ये टाकुन पंचासमक्ष एकत्र केल्या. अशा एकुण 130 नोटांचे एक बंडल करुन त्यास रबर लावण्यात आले. आमचे सुचनेप्रमाणे पंच क्र. 2, नंदलाल महाजन यांनी सदर नोटांचे नंबर एका कोऱ्या कागदावर लिहुन घेतले. त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या. त्यानंतर पोहवा/विजय ठाकरे यांनी सदर लाचेच्या नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवुन सदर नोटा तक्रारदार यांचे पॅन्टचे डाव्या बाजुकडील पुढील खिशात व्यवस्थित ठेवुन दिल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार विक्रम गावीत व पंच क्र. 1 श्री. प्रशांत बोरदे यांचेसह लाचेची रक्कम घेवुन नंदुरबार शहराच्या बाहेरील धुळे चौफुली ते नवापुर रोडवरील मत्स्यव्यवसाय विभाग, नंदुरबार कार्यालय येथे लोकसेवक किरण पाडवी यांची भेट घेणे कामी पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सापळा कारवाई संदर्भात आम्ही तक्रारदार यांचेसह पंच तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोहवा/नरेंद्र पाटील यांनी आमचे सुचनेवरून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते सुरू करून तक्रारदार विक्रम गावीत यांचे शर्टाचे आत बनियनला लावुन देवुन त्यांना पंच नं 1 यांच्या सोबत मोटार सायकलने रवाना केले व आम्ही सापळा पथकातील सदस्य असे तक्रारदार यांचे मोटार सायकलच्या मागोमाग रवाना झालो. त्यानंतर तक्रारदार विक्रम गावीत व पंच क्र. 1 प्रशांत बोरदे असे नंदुरबार शहराच्या बाहेरील बायपास रोडवरील कामनाथ मंदीराजवळील मत्स्यव्यवसाय विभाग, नंदुरबार कार्यालयाजवळ पोहचलो. त्यानंतर आम्ही आमचे खाजगी दुचाकी वाहने सदर ठिकाणापासुन काही अंतरावर थांबवुन नमुद कार्यालयाच्या आजुबाजुस सुरक्षित जागा घेवुन थांबलो. त्यानंतर तक्रारदार यांनी ठरवुन दिल्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारल्याबाबत 15.43 वा. सापळा पथकास इशारा केला. तेव्हा सदर ठिकाणी आम्ही व सापळा पथकाने लोकसेवक किरण पाडवी यांना ताब्यात घेतले. त्यानंतर लागलीच पोहवा/नरेंद्र पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर ताब्यात घेतलेल्या लोकसेवक किरण पाडवी यांस त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नांव किरण गणेश पाडवी वय 54 वर्षे, व्यवसाय नोकरी, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी नेमणुक - सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, नंदुरबार रा. 20, अरविंद नगर जिजामाता कॉलेजसमोर तळोदा रोड, नंदुरबार असे सांगितले.

तरी दिनांक 23/01/2026 रोजी लोकसेवक किरण गणेश पाडवी वय 54 वर्षे, व्यवसाय नोकरी, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी नेमणुक- सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय विभाग, नंदुरबार रा. 20, अरविंद नगर जिजामाता कालेजसमोर तळोदा रोड नंदुरबार यांनी तक्रारदार यांना नवजीवन मच्छिमार सहकारी संस्थेमार्फत दि. 01/07/2025 ते दि. 30/06/2030 पावेतो पाच वर्षाचे कालावधी करीता असलेल्या सामंजस्य कराराने रंगावली तलावाचा मासेमारीचे हक्कसाठी मंजूर तलाव ठेका तलावात मासे न टाकल्याचे कारण सांगुन तक्रारदार यांचा ठेका रद्द करुन अन्य इसमास देण्याची भिती दाखवुन ठेका रद्द न करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे 2 लाख 65 हजार रुपये लाचेची मागणी करून त्यापैकी तक्रारदार यांच्याकडुन लाचरक्कम 65,000/- रुपये लोकसेवक किरण गणेश पाडवी ,मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी यांनी 15.43 वाजेच्या सुमारास पंच क्र. 1 यांचेसमक्ष सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय विभाग, कार्यालय, नंदुरबार येथे तक्रारदार यांना लाचेची रक्कम स्वतःकडे असलेल्या बॅगमध्ये ठेवण्यासाठी बॅगची चेन उघडुन लाचेची रक्कम त्यामध्ये ठेवण्याचा इशारा करुन तक्रारदार यांनी लाचेची रक्कम बॅगमध्ये ठेवल्यानंतर बॅगची चेन लावुन बॅग स्वतःकडे ठेवुन लाचेची रक्कम स्विकारली, म्हणुन माझी त्यांचेविरूध्द सरकारतर्फे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, 1988 चे कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Nilesh Ravindra Desale(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): DySP प्रशांत भरते.

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा): [signature]

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[signature] 4980

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Nilesh Ravindra Des

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI

पोलीस ठाणे अंमलदार
नंदुरबार शहर पो.स्टे.